# गुरू शोधायला शिकले पाहिजे : प्रेमप्रकाश नाईक

▶ दोडामार्ग (प्रतिनिधी)

गुरू हा समाजातील प्रत्येक व्यक्तीमध्ये दडलेला असतो, फक्त ते शोधायला शिकले पाहिजे. विद्यार्थ्यांनी सकारात्मक दृष्टीकोनाबरोबरच नम्रता अंगिकारून चांगले छंदही जोपासले पाहिजेत, असे आवाहन अभिजात संगीत तज्ज्ञ प्रेमप्रकाश नाईक यांनी येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात आयोजित केलेल्या समारंभात प्रमुख पाहुणे या नात्याने बोलताना केले.

यावेळी संस्थेचे सदस्य भाई परमेकर, यांनी आपल्याला लाभलेल्या गुरूंमुळेच आपण यशस्वी वाटचाल केली, असे मत व्यक्त केले. आर. वाय. पाटील यांनी आपण जेव्हा द्विधा स्थितीमध्ये असतो त्यावेळी गुरूची आठवण करावी व मार्गक्रमण करावे, असे आवाहन केले.

याप्रसंगी महाविद्यालयातील भूषण सावंत, अनिल गावडे, भाग्यश्री गवस, सागर गवस, पोर्णिमा वराडकर आदी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच विद्यार्थ्यांनी गुरू - शिष्यावर आधारीत नाटिका सादर केली. याप्रंसगी व्यासपिठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील, प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतीक विभाग प्रमुख प्रा. पी. एन. ढेपे यांनी केले. सूत्रसंचालन मीना कुडचिरकर हिने तर उपस्थितांचे आभार राजेश नाईक याने मानले.

प्रहार दि. 20/6/98
कार्यक्रम दि. 12/6/98